Hearty Congratulations!

पुण्य नगरी

वेदांश कावली, जिवेश भागत स्पर्धेत चमकले

वसईत आंतरक्लब बुद्धिबळ स्पर्धा

वसई : गणपतराव क्रीडा भवनात प्रथमच आंतरक्लब बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा घेण्यात आली. त्यात विविध मान्यताप्राप्त बुद्धिबळ क्लबमधील ७० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत यंगस्टार बुद्धिबळ क्लब (विरार आणि बोईसर), सिमरन बुद्धिबळ अकॅडमी, इन्फंट जीजस हायस्कूल बुद्धिबळ अकॅडमी (नालासोपारा) आणि क्रीडाभवन बुद्धिबळ अॅकडमी (वसई) या क्लबमधील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे मार्गदर्शक मकरंद कानिटकर, तर समन्वयक दीपक आडे होते. स्पर्धेचे प्रमुख पंच गजानन सोनी होते. त्यांच्यासोबत सुदेश पांचाल आणि आकाश पांचाळ यांनी पंच म्हणून काम पाहिले.

एकूण ६ गटात घेण्यात आलेल्या स्पर्धेतील ६ वर्षाखालील गटात वेदांश कावली याने प्रथम क्रमांक पटकावला. ८ वर्षाखालील मुले गटात जिवेश भागत याने प्रथम, आवडेन रोसारियो द्वितीय, शिवांश शेवाले याने तृतीय क्रमांक पटकावला.

८ वर्षाखालील मुलींमध्ये प्रथम-देवांशी डकारे, द्वितीय-सानवी देशमुख, तृतीय- हीयारा मेहेर, १० वर्षाखालील मुलांमध्ये प्रथम-शिवांश धार्मिक, द्वितीय-अभिनव सिंग गिरासे, तृतीय-प्रियांश पाटील, मुलींमध्ये प्रथम-तिशा जैन, द्वितीय-कियारा शिर्के, तृतीय-मजुमदार किशी, १२ वर्षाखालील मुलांमध्ये प्रथम-मजुमदार शौर्य, द्वितीय-अनय सावंत, तृतीय- मृण्मय मालवतकर, मुलींच्या गटात प्रथम -दर्शिका लाखन, द्वितीय-सावी परब, तृतीय-सायली सावे, १४ वर्षाखालील मुलांमध्ये प्रथम-मानस गुप्ता, द्वितीय-अथर्व कदम,तृतीय-प्रणव दराडे, मुलींच्या गटात प्रथम-विदिशा बोलके, १७ वर्षाखालील मुलांमध्ये प्रथम-आगास्कर कौस्तुभ, द्वितीय-वीर विश्वकर्मा, तृतीय-प्रणय शेट्टी, मुलींमध्ये प्रथम-आकांक्षा गुप्ता विजेते ठरले.

A proud moment for our school!

Master. Jivesh Manojkumar Bhagat of **Std. I – Mercury** has won the **Gold Medal** in the **Inter Club Chess Championship** organized by **Young Star Chess Club and Krida Mandal, Vasai**.

Your dedication, focus, and hard work have truly paid off. Keep shining and making us proud!